महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया

कुंवर तिलकसिंह सामान्य रुग्णालय परिसर, नेहरु चौक, गोंदिया, महाराष्ट्र

फोन नं. ०७१८२-२३८०९० ई मेल :gmcgondiya@gmail.com

जा.क्र.शावैमगों/कंत्राटी/सहा.प्राध्या/जाहिरात३६४/११८४९ /२०२४ दि. ०४ १२ /२०२४

## जाहिरात

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील **सहाय्यक प्राध्यापक** यांचे पदे करार तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता भरण्याबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३ दि. १८ जुलै, २०२४.

२. शासन निर्णय क्र. वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वेसेवा-२ दि. ३१ डिसेंबर, २०२०.

३. या कार्यालयाचे जाहीरात जा.क्र.शावैमगों/कंत्राटी/सहा.प्राध्या/जाहिरात ३६४/११७३९/२४/ दि.२९.११.२०२४

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील विद्यार्थी व रुग्णहीत लक्षात घेता रिक्त असलेले सहाय्यक प्राध्यापक यांचे कंत्राटी स्वरुपात ३६४ दिवसाकरिता अटी व शर्तीच्या अधीन राहून भरण्याबाबतची जाहिरात देण्यात येत असून सदर जाहिरातीचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**पदाचे नाव :- सहाय्यक प्राध्यापक (करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता)**

| अ.क्र. | विभागाचे नांव | रिक्त पदे | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | ठोक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १<br>२<br>३<br>४<br>५<br>६<br>७ | शरीररचनाशास्त्र<br>जीवरसायनशास्त्र<br>औषधनिर्माणशास्त्र<br>न्यायवैद्यकशास्त्र<br>जनऔषधवैद्यकशास्त्र<br>त्वचा व गुप्तरोगशास्त्र<br>बालरोगशास्त्र | ०२<br>०१<br>०२<br>०१<br>०१<br>०१<br>०१ | खुला संवर्ग-४० वर्षा पर्यंत<br>मागास संवर्ग-४५ वर्षा पर्यंत | १.मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी (MD/MS/DNB)<br>२. वरीष्ठ निवासी या पदाचा एक वर्षाचा अनुभव बंधनकारक राहील. (त्या बाबतचे आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात यावे)<br>३. टिचिंग अनुभव असल्यास प्राध्यान्य | रु१,१०,०००/- (एकत्रीत सर्व भ-त्यासहीत) |
| | एकुण | ०९ | ... | ... | ... |

सहाय्यक प्राध्यापक या पदाचे आरक्षण खालील प्रमाणे राहील.

| प्रवर्ग | एससी | एसटी | ओबीसी+ एसबीसी | वि.जा.(अ) + भ. ज.(ब) भ.ज.(क) + भ.ज.(ड) | ईडब्ल्युएस | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | १३% | ७% | २१% | ११% | १०% | ३८% | १००% |
| पदे | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०३ | ०९ |

| अ.क्र. | विभागाचे नांव | पदाचे नाव व रिक्त पदे | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | ठोक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Community Medicine | Statisticion cum Assistant Professor - 01 | खुला संवर्ग-४० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी (M.Sc. (Statistics) with Ph.D. (Statistics) | रु१,१०,०००/- (एकत्रीत सर्व भ-त्यासहीत) |

....२....

Scanned with CamScanner

१. या संस्थेच्या www.gmcgondya.in व www.med-edu.in संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे तसेच अर्ज उपलब्ध आहे.

| | |
|---|---|
| २. अर्ज उपलब्ध | :- दि. ०४/१२/२०२४ |
| ३. अर्जाचे शुल्क | :- रु.१००/- |
| ४. अर्ज सादर करण्याचा शेवटचा | :- दि. १७/१२/२०२४ (सायंकाळ ०४.०० पर्यंत ) |
| ५. मुलाखतीचा दिनांक व वेळ. | :- दि. १९/१२/२०२४ वेळः- दु.१२.०० वाजता. |
| ६. मुलाखतीचे ठिकाण | :- अधिष्ठाता यांचे कार्यालय शा.वै.म.,गोंदिया.(के.टी.एस.रुग्णालय,परिसर) |

७. सदर जाहिराती मधील पदे कमी-जास्त किंवा रद्द करण्याचा अधिकारी अधिष्ठाता यांना राहील.
८. शासकीस सुटीचे दिवस वगळून शासकीय वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज या कार्यालयात सादर करावे.
९. मुलाखतीच्या वेळेस मुळ कागदपत्रे सादर करावे.
१०. मुलाखती करिता उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचे दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
११. उमेदवारांने कुठलाही प्रकारे शिफारस पत्र जोडू नये किंवा इतर माध्यमातून शिफारस केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
१२. सदरची पदे ही आरक्षणानूसार भरण्यात येईल.

**नियम व अटी :**

१) करार पध्दतीने नियुक्ती कालावधी हा नियमीत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.
२) उमेदवाराचे कामकाज समाधारनकारण नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्ठात येईल.
३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनूसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.
४) वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यावसाय करण्याची मुभा राहील.
५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणत्याही हक्क राहणार नाही. तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.
६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्यांच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.
७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती आधरसामुग्रीबाबत गोपनीय पाळणे आवश्यक राहील.
८) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.
९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपतपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल,असे शपथपत्र सादर करण्या-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षण्कि सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.
१०) बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्यांला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.
११) अर्जदाराने संबंधित पदसाठी शारीरीकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.
१२) सदर जाहिराती मधील नमुद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णतः रदद करण्याचा अधिकार अधिष्ठाता स्वतःकडे राखून ठेवला आहे.
१३) नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.
१४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.
१५) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
१६) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल)
१७) मुलाखतीला येतांना उमेदवारांनी (Online) ऑन लाईन सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

| आवश्यक कागदपत्रे |
|---|
| १. एमबीबीएस पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र,२. एमबीबीएस पदवी गुणपत्रीका (पुर्ण वर्षाचे) ३.पदव्युत्तर उत्तीर्ण प्रमाणपत्र ४.पदव्युत्तर गुणपत्रीका (पुर्ण वर्षाचे) ५. पदवी प्रयत्न (Attempt) प्रमाणपत्र ६. MMC/MCI Registration and Renewal Certificate.7.Bond Certificate ८. वरिष्ठ निवासी पदाचा १ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र. ९) जात प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र. |

(डॉ.कुसुमाकर घोरपडे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गोदींया.

प्रत,
१.मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-०१
२.मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-०१
प्रतिलिपी, १) रोखपाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया२) सुचना फलक, शावैम, गोंदिया, ३) सुचना फलक, ग्रंथालय विभाग, शावैम,गोंदिया

Scanned with CamScanner

(रु.१००/- चे शासकीय भरणा केलेली पावतीचा क्र................. दि...............)

| |
|---|
| अर्जदारांने स्वत:चा फोटो साक्षांकित करुन येथे लावने आवश्यक आहे. |

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गोंदिया.

**विषय : सहाय्यक प्राध्यापक या पदावर ३६४ दिवसाकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील कंत्राटी पध्दतीने........................ या विषयाकरिता अर्ज सादर करण्याबाबत....**

१) उमेदवाराचे संपूर्ण नाव :-.................................................................
२) उमेदवाराचा कायमचा पत्ता :-...............................................................
.................................................................................

३) शैक्षणिक अर्हता: पदव्युत्तर पदवी(MD/MS)पास केल्याचे दिनांक :-..................................

४) पदव्युत्तर पदवी(MD/MS)उत्तीर्ण केलेल्या विद्यापीठाचे नाव :-.......................................

५) संबंधित विषयात वरिष्ठ निवासी पदाचा अनुभव आहे/नाही. (असल्यास सोबत कागदपत्रे जोडावे.)

६) जन्म दिनांक(अंकात) :- .................... अक्षरात................... (12 th Diploma जोडावे.)

७) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांक म्हणजे दि.१७.१२.२०२४ रोजीचे वय:- वर्ष.... महिना.... दिवस...

८) आधार कार्ड क्र........................................

९) मोबाईल क्रमांक:-............................ .....ई-मेल आयडी :-...............................

१०)जात व जात वैद्यता प्रमाणपत्र ................(सोबत जोडावे)

११)अर्जदाराची शैक्षणिक अर्हता:-

| शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळाचे नाव/विद्यापिठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 12 th | | | | | |
| MBBS | | | | | |
| MD/MS | | | | | |
| DNB/DM/MCH/Phd | | | | | |
| Diploma / Fellowship | | | | | |

१२) Publication :- Total-------- ( सोबत जोडावे) १३) BCBR & MET( असल्यास सोबत जोडावे)

१४) संबंधित पदाबाबत अनुभवाचा तपशिल खालील प्रमाणे देण्यात यावे.(प्रमाणपत्र जोडावे)

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | पद | रुजू झाल्याचे दिनांक | एकुण अनुभव | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

पान-२ वर

Scanned with CamScanner

१५. अर्जा सोबत जोडलेली प्रमाणपत्रे.

| अ.क्र. | प्रमाणपत्रे | अ.क्र. | प्रमाणपत्रे | अ.क्र. | प्रमाणपत्रे |
|---|---|---|---|---|---|
| १ | | ५ | | ९ | |
| २ | | ६ | | १० | |
| ३ | | ७ | | ११ | |
| ४ | | ८ | | १२ | |

(टिपः- उपरोक्त नमूद केलेले अ. १ ते १५ बाबतचे स्वतःच्या स्वाक्षरीने साक्षांकित करुन कागदपत्रे वर अनुक्रमिनिके प्रमाणे अर्जा सोबत जोडणे बंधनकारक राहील. )

मी श्री................................................ प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहिती प्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो/करते की, अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणा-या कारवाईस पात्र राहिल. तसेच सदर पदावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असल्याने शासन सेवेत कायम करण्यासाठी हक्क राहणार नाही, याची मला पूर्णपणे जाणीव असून शासन सेवेत कायम करण्यासाठी भविष्यात हक्क सांगणार नाही अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ :- अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :- (अर्जदाराचे संपूर्ण नाव..............................................

| आवश्यक कागदपत्रे |
|---|
| १. एमबीबीएस पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र,२. एमबीबीएस पदवी गुणपत्रीका (पुर्ण वर्षाचे) ३.पदव्युत्तर उत्तीर्ण प्रमाणपत्र ४.पदव्युत्तर गुणपत्रीका (पुर्ण वर्षाचे) ५. पदवी प्रयत्न (Attempt) प्रमाणपत्र ६. MMC/MCI Registration and Renewal Certificate.7.Bond Certificate ८. वरिष्ठ निवासी पदाचा १ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र. ९) जात प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र. १०) Teaching Experience |

Scanned with CamScanner